**Scholarly Research Journal for Humanity Science & English Language,**
***Online ISSN 2348-3083, SJ IMPACT FACTOR 2019: 6.251, www.srjis.com***
*PEER REVIEWED & REFERRED JOURNAL, OCT-NOV, 2019, VOL- 7/36*

# शैक्षणिक संशोधनासाठीचे विविध दृष्टीकोन – एक अभ्यास

**डॉ अरुणा राजाराम भांबरे**

*प्रभारी प्राचार्य श्री समर्थ कॉलेज ऑफ एज्युकेशन अँड रिसर्च ( बी.एड ) म्हसणे फाटा पारनेर अहमदनगर.*

**Abstract**

*आज सर्वच क्षेत्रात नवे प्रवाह काळानुरूप अनुभवायला मिळतात. शिक्षण क्षेत्रातील नवीन प्रवाहांमध्ये शैक्षणिक संशोधनासाठीचे विविध दृष्टीकोन हा एक महत्वाचा विषय आहे. शिक्षणप्रणाली आखताना विद्यार्थी हा चांगला नागरिक, विज्ञाननिष्ठ आणि अखंड ज्ञानलालसा असलेला असणे आवश्यक आहे.*

*कालानुरूप शिक्षणप्रणालीमध्ये नवे प्रवाह येतात, आवश्यक बदल घडून येतात. शैक्षणिक संशोधनासाठीचे विविध दृष्टीकोनांचा अभ्यास करताना शैक्षणिक संशोधन ही संकल्पना महत्वाची आहे कारण शिक्षणक्षेत्रातील विविध समस्यांच्या निराकरणासाठी, नाविन्याचा शोध घेण्यासाठी व शिक्षणप्रणाली ही प्रभावी आणि गुणवत्तापूर्ण होणे आवश्यक आहे, याचाच अभ्यास करून संशोधकाने विषयानुरूप पुढील उद्दिष्टांचा समावेश केलेला आहे. उद्दिष्ट 1. शैक्षणिक संशोधन या संकल्पनेचा अभ्यास करणे. 2 शैक्षणिक संशोधनाची गरज व महत्व यांचा अभ्यास करणे. 3. शैक्षणिक संशोधनातील विविध दृष्टीकोनातील शिक्षकाची भूमिका अभ्यासणे.*

*प्रस्तुत संशोधनात विविध संदर्भ स्त्रोतांचा अभ्यास केलेला असून यामध्ये संदर्भ पुस्तके, मासिके, नियतकालिके, पूर्व संशोधन कार्य यांचा आढावा घेण्यात आलेला आहे.*

***गुज शब्द: शैक्षणिक संशोधन, दृष्टीकोनांचा अभ्यास***

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

**प्रस्तावना:**

आज प्रत्येक क्षेत्रात सातत्याने नवनवीन प्रवाह दिसून येत आहेत. ज्या वेगाने माहिती तंत्रज्ञानात रोज काही ना काही भर पडत आहे व त्याची पुनर्मांडणी होत आहे, त्यावरून आपण पूर्णत: शैक्षणिक संशोधनाबाबत अद्ययावत असणे गरजेचे आहे. सद्यस्थितीतील माहिती युगात शैक्षणिक संशोधनाचे नवनवीन प्रवाह येत आहेत व याची जाणीव होण्यास आपल्याला वेळ लागत आहे. संयुक्त अरब अमिराती, अमेरिका, जपान, इंग्लंड, जर्मनी, न्यूझीलंड, ऑस्ट्रेलिया अशा विकसित देशांमध्ये शैक्षणिक संशोधनातील घटकांचे व परस्परसंबंधाचे नियोजन काटेकोरपणे राबविले जाते. उदा. शैक्षणिक संशोधनातील एका समस्येचा अभ्यास

*Copyright © 2019, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

केला असता, वाटेल तेथे भौगोलिक समस्या निर्माण केल्यास जबरदस्त दंड आकारला जातो. भौगोलिक घटकांच्या जबाबदारीची व्यवस्था व त्याचे पालन करणारे सुजाण नागरिक याबाबतचे नियोजन सुबद्ध पद्धतीने करतात. विकसित देशांमध्ये शैक्षणिक संशोधनातील घटकांचा अभ्यास व त्याचे उपयोजन यावर भर दिलेला दिसून येतो. उदा. शैक्षणिक संशोधनाद्वारे असे दिसून आले की, सूर्यग्रहण व चंद्रग्रहण या खगोलीय घटना आहेत, त्यामुळे अंधश्रध्देवर विश्वास न देता खगोलीय घटनेकडे पाहावे याबद्दल मुलांना लहानपणापासूनच शिक्षण दिले जाते. शैक्षणिक संशोधनातून अशी सकारात्मक परिस्थिती आपल्याकडेही येऊ शकते. गरज आहे मानसिकता बदलून प्रत्येकाने प्रत्यक्ष कृती करण्याची **'केल्याने होत आहे हे आधी केलेची पाहिजे'** यासाठी प्रस्तुत संशोधन विषय नाविन्यपूर्ण आहे.

**संशोधनाचा अर्थ व व्याख्या:**

संशोधनाला इंग्रजीमध्ये Research असे म्हणतात. Research म्हणजे पुन्हा-पुन्हा शोधणे होय. वेबस्टरच्या शब्दकोशानुसार 'कोणत्याही ज्ञान शाखेमध्ये नवीन तत्वे किंवा तथ्ये शोधण्यासाठी व जुनी तत्वे, तथ्ये परीक्षणासाठी केलेला चिकित्सक व पध्दतशीर अभ्यास म्हणजे संशोधन होय.' शास्त्रीय तत्वज्ञानात्मक पद्धतीने समस्यांच्या उत्तराचे ध्येय ठेवून त्या दिशेने केलेले कार्य हे संशोधनाचे उद्दिष्ट असते. संशोधन ही समस्या-निराकरणाची सुव्यवस्थित प्रकिया आहे.

'संशोधन म्हणजे सामान्यीकरणाच्या हेतुने वस्तू, संकल्पना व प्रतीकांची हाताळणी होय.' संशोधनाने प्रस्थापित ज्ञानाच्या कक्षा वाढतात. वर्तमान ज्ञानात सुधारणा होते. ज्ञान प्रमाणित होते. प्रमाणित ज्ञानाचा सिध्दांत-निर्मितीसाठी व व्यवहारात उपयोग केला जातो.

(स्लेसिंजर व स्टिफेन्सन- सामाजिक शास्त्राचा विश्वकोष 1957)

'Research is a systematic objective and accurate search for the solution to a well- defined problem.' (Mouly, G.J 1970)

"Research is more systematic activity directed towards discovery and the development of an organized body of knowledge". (J.W. Best 2016)

शैक्षणिक घटना अथवा प्रसंगाचे स्पष्टीकरण करता यावे, त्याबाबत भविष्यकाथन करता यावे यावर भर दिला जातो .

*Copyright © 2019, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

**प्रस्तूत संशोधनाची उदि्दष्टे:**

उदि्दष्ट 1. शैक्षणिक संशोधन या संकल्पनेचा अभ्यास करणे.

2. शैक्षणिक संशोधनाची गरज व महत्व यांचा अभ्यास करणे.

3. शैक्षणिक संशोधनातील विविध दृष्टीकोनातील शिक्षकाची भूमिका अभ्यासणे.

**शैक्षणिक संशोधन:**

'शिक्षण प्रक्रियेशी संबंधित प्रश्न सोडविण्यासाठी जेव्हा वैज्ञानिक पद्धतीचा उपयोग केला जातो, तेव्हा त्या संशोधनाला शैक्षणिक संशोधन असे म्हणतात.'

**शैक्षणिक संशोधन- व्याख्या:**

"शैक्षणिक संशोधन म्हणजे अशी कृती की, जी शैक्षणिक परिस्थितीतील वर्तनशास्त्राच्या प्रगतीच्या दिशेने गतीमान झालेली असते. अतिशय प्रभावी पद्धतींनी आपले ध्येय प्राप्त करण्यास शिक्षकास मदत करणारे ज्ञान प्राप्त करून देणे हे या शास्त्राचे अंतिम ध्येय असते."- (Travers, M.W. 1969)

"Educational research is that activity which is directed towards development of a science of behavior in educational situations. The ultimate aim of such a science is to provide knowledge that will permit the educator to achieve his goals by the most effective methods." - (J. W. Best. 1998)

शैक्षणिक संशोधनाच्या वरील व्याख्या लक्षात घेतल्या तर असे स्पष्ट होते की, शैक्षणिक संशोधन हे शिक्षणशास्त्राशी संबंधित आहे. शिक्षणक्षेत्रात निर्माण होणा-या समस्यांचे वैज्ञानिक पद्धतीने अध्ययन करणे, शिक्षण प्रक्रियेतील नव्या तत्त्वांचा शोध घेणे हा शैक्षणिक संशोधनाचा प्रमुख उद्देश आहे.

**शैक्षणिक संशोधन - गरज व महत्त्व:**

शिक्षण प्रक्रियेतील प्रत्येक घटकांचे प्रकार्य असते. एका घटकाचा दुस-या घटकाशी प्रकार्यात्मक संबंध असतो. शिक्षण प्रक्रियेतील प्रत्येक घटकांचा, शिक्षण व्यवस्था आणि संरचनेवर चांगला-वाईट परिणाम होत असतो, म्हणूनच शैक्षणिक घटकांतील प्रकार्यात्मक संबंधाचा शोध घेणे अनिवार्य असते, त्याकरिता शैक्षणिक संशोधनाची गरज असते. नवनवीन तथ्ये, संकल्पना आणि सत्याचा शोध घेणे आणि सिध्दांताची मांडणी करणे हे शैक्षणिक संशोधनाचे उदि्दष्ट आहे. अध्ययन-अध्यापन पद्धती, शिक्षण तंत्रे इत्यादीबाबत नवीन तथ्ये, संकल्पना आणि सत्याचा शोध घेण्यासाठी शैक्षणिक संशोधनाची गरज असते. शैक्षणिक संशोधन

*Copyright © 2019, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

करून प्राप्त केलेल्या ज्ञानाचा उपयोग करून मानवी जीवन समृध्द करता येते.

(वर्तक ललिता, कस्तुरे पद्मजा 2017)

शिक्षण क्षेत्रात होणा-या संशोधनाचे महत्त्व खालील मुद्दयांच्या आधारे स्पष्ट करता येते.


1. नवनवीन ज्ञान योग्य प्रकारे आत्मसात करण्यासाठी व संशोधनाचे मानवी जीवनातील महत्त्व समजण्यासाठी शैक्षणिक संशोधन महत्त्वाचे आहे.

2. समाजात होणारी परिवर्तने आणि ज्ञानाचा प्रस्फोट यामुळे शिक्षणक्षेत्रातही बदल होण्यासाठी व प्रत्येक विषयाचे सखोल ज्ञान होण्यासाठी शैक्षणिक संशोधन महत्त्वाचे आहे.

3. शिक्षणातील समस्या सोडविण्यासाठी तसेच व्यावसायिक कौशल्य आत्मसात करून प्रगती साधण्यासाठी शैक्षणिक संशोधन महत्त्वाचे आहे.

**शैक्षणिक संशोधनाचे प्रकार:** (वर्तक ललिता, कस्तुरे पद्मजा 2017)

शैक्षणिक संशोधनाचे विश्लेषणात्मक दृष्टिकोनातून खालील तीन प्रकार पडतात.




**1. मूलभूत संशोधन:**

मूलभूत संशोधन हे सिध्दांताभिमुख असते. कर्लिंगच्या मते मूलभूत संशोधन हे सिध्दांत परीक्षणासाठी केले जाते. मूलभूत संशोधनाने त्या-त्या क्षेत्रात मूलभूत तत्वे व नियम यांच्या निर्मितीद्वारे प्रस्थापित ज्ञानात मोलाची भर पडत असते.

**2. उपयोजित संशोधन:**

उपयोजित संशोधन हे व्यवहारभिमुख असते, हे संशोधन उपयुक्त उपयोगासाठी ज्ञान या हेतूने प्रेरित झालेले असते. मानवी जीवनाच्या विविध क्षेत्रांमधील समस्यांच्या निराकरणासाठी संशोधन निर्मिती होते. ज्ञानाची, सिध्दांताची उपयोगिता अजमावून पाहणे, विशिष्ट समस्यांच्या निराकरणार्थ विशिष्ट ज्ञान निर्माण करणे हा उपयोजित संशोधनाचा हेतू असतो.

*Copyright © 2019, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

**3. कृति संशोधनः**

दैनंदिन जीवनात ज्या विविध शैक्षणिक समस्यांना तोंड द्यावे लागते, त्यासंबंधी शिक्षकांनी प्रत्यक्ष कृतियुक्त उपाय योजून त्या उपायांच्या परिणामकारकतेची तपासणी केली जाते, त्यास कृति संशोधन असे म्हणतात.

वरील संशोधन प्रकारांपैकी संशोधकाने निवडलेला विषय हा उपयोजित संशोधनात समाविष्ट होतो. कारण त्यातून मिळालेले निष्कर्ष हे प्रातिनिधिक स्वरूपाचे आहेत. तसेच विषयाची व्याप्ती मर्यादित असून निष्कर्ष विशिष्ट विभागापुरतेच मर्यादित आहेत.

**शैक्षणिक संशोधनासाठीचे विविध दृष्टीकोनः**

शैक्षणिक संशोधन हे गरजाधारित असते. संशोधन हे शास्त्रशुध्द पद्धतीनेच केले जाणे अपेक्षित असते. संशोधनाची पद्धती कोणती असावी हे समस्येचे स्वरूप, परिस्थिती यावर अवलंबून असते.




*शैक्षणिक संशोधनासाठीचे विविध दृष्टीकोन*

शिक्षण क्षेत्रातील विविध समस्यांचे निराकरण करण्यासाठी व शैक्षणिक गुणवत्ता वृध्दींगत करण्यासाठी शैक्षणिक संशोधनासाठीचे विविध दृष्टीकोन महत्वाचे आहेत .

विद्यार्थ्यांचा बौध्दिक विकास, मानसशास्त्र, अवधान व ग्रहण यांचा संबंध, शिकण्याची प्रक्रिया व परिणामकारक अध्ययनाचे नियम, अध्यापन पध्दती याचे वस्तुनिष्ठ ज्ञान शैक्षणिक संशोधनासाठीचे विविध दृष्टीकोनातून प्राप्त होते .

Copyright © 2019, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language

विविध प्रयोग करून नवीन प्रभावी अध्यापन पध्दतींचा शोध घेणे आणि प्रस्थापित पध्दतीमध्ये सुधारणा घडवून आणणे हे शैक्षणिक संशोधनासाठीचे विविध दृष्टीकोनातूनच उदयास येते .

सामाजिक विकासाबरोबरच शिक्षणाची उद्दिष्टे, पध्दती, साधने आणि व्यवस्था यामध्ये परिवर्तन करणे आवश्यक असते . असे परिवर्तन घडवून आणणे शैक्षणिक संशोधनामुळेच शक्य होते .

**संदर्भ :**

*नानकर, प्र., शिरोडे, सं. (2009).* ***वर्तमान शिक्षणातील विचारप्रवाह****, पुणे; नित्य नूतन प्रकाशन.*

*वर्तक, ललिता., कस्तुरे, पद्मजा. (2017).* ***शैक्षणिक संशोधनाची ओळख****, नाशिक; इनसाईट पब्लिकेशन्स.*

*मुळे, रा. शं., उमाठे, वि. तु. (1987).* ***शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे****, नागपूर; महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ.*

*कदम चा . प .,* ***2007 शैक्षणिक संख्याशास्त्र,*** *पुणे नित्यनूतन प्रकाशन .*

*पंडित ब . वि .,* ***2010 शिक्षणातील संशोधन,*** *पुणे नित्यनूतन प्रकाशन .*

*दांडेकर वा . ना .,* ***2004 शैक्षणिक संख्याशास्त्र व मूल्यमापन,*** *पुणे नित्यनूतन प्रकाशन .*

*करंदीकर सु .,* ***2006 शैक्षणिक मानसशास्त्र*** *कोल्हापूर, फडके प्रकाशन .*

*भांडारकर के .,* ***2005 सुलभ शैक्षणिक संख्याशास्त्र,*** *पुणे नित्यनूतन प्रकाशन .*

*Best J.W & Khan J.V (2011)* ***Research in Education*** *(10th Edition) Published by PHI Leaving Private Limited New Delhi- 110001*

*Richards, J.C., Rodgers S.T. (2001)* ***Approaches & Methods in Language Teaching Cambridge****: Cambridge University Press*

*Sachin, Sakhare (2018)* ***Skill Sets of the 21st Century in Higher Education****- Strategies for Enhancing the Geo-Literacy in 21st Century and Role of Teacher, Pune: Amitesh Publisher*

*Smith, R. (1999).* ***The future of teacher education: Principles and prospects****. Paper presented at the American Education Research Association Symposium.*

*Copyright © 2019, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*